CNR No.MHSN150009482025

**नियमित दिवाणी दावा क्र.२२७/२०२५ मधील निशाणी क्र.३८ खालील आदेश**

(भगवान धनवडे वगैरे वि. जिल्हाधिकारीसो, सांगली)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ९ यांनी वादींचेविरुध्द दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये तूर्तातूर्त ताकिदीकरिता दाखल केलेला आहे.

**वादीचे ताकीद अर्जातील कथन खालीलप्रमाणे**–

०२. सदरकामी वादीने प्रतिवादीविरूध्द हद्द कायम व निरंतर ताकीदीबाबत दाखल केलेला आहे. सदरकामी वादी यांनी प्रतिवादी नं.१ ते ८ यांचेविरूध्द दावा मिळकतीमध्ये 'जैसे थे' परिस्थिती ठेवणेचा मे. कोर्टाकडून आदेश घेतलेला आहे. मात्र अशा आदेशाचा गैरफायदा घेवून वाद रस्त्याचे क्षेत्रामध्ये बदल होईल अशा प्रकारे उस पिक तसेच मोठी झाडे लावणेचे तयारीत आहेत. त्यामुळे दावा मिळकतीमधील असणाऱ्या शिवेवरील रस्त्यावर मे. कोर्टाचे आदेशाचा गैरफायदा घेवून वादी यांचे कृत्याने फेरबदल झालेस प्रतिवादी नं. ९ व ११ यांचे तसेच इतर सहहिस्सेदार यांचे नुकसान होणार आहे.

०३. प्रतिवादी यांचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी नं.१ ते ८ या सरकार पक्षांना त्यांचे कायदेशिर कर्तव्यामध्ये मे. कोर्टाचे अशा आदेशाने बाधा आणल्यासारखे झाले असून त्याचा गैरफायदा वादी हे घेत आहेत. तरी वादी यांना तातडीने दावा मिळकती गट नं.२०६९/१ चे पश्चिम बाजुकडील शिवेचा रस्ता व गट नं. ५९५/१ च्या उत्तरेकडील शिवेचा रस्त्याचे क्षेत्रावर मे. कोर्टाचे आदेशाचा गैरफायदा घेवून, झाडे लावून तसेच ऊस पिकाची लागण करुन फेरबदल करु नये असे आदेश व्हावेत. वाद मिळकतीमधील रस्त्याअभावी, प्रतिवादी तसेच इतर सहहिस्सेदार प्रतिवादी यांनी त्यांचे गट नं.२०६८, ५९७ मधुन बसणारा वांगी व भाळवणी शिवेचा रस्ता पुर्व बाजुकडून सोडलेला आहे. मात्र पश्चिम बाजुकडून सदरचा रस्ता होवू नये या दृष्ट हेतूने वादीने सदरचा दावा दाखल केलेला आहे. व सदर दाव्याचे कामी प्रतिवादी नं.१ ते ८

यांचेविरूध्द निशाणी क्र.१३ येथे घेतलेले आदेशाचा गैरफायदा घेवून सदर शिवेचे रस्त्यावर कोणत्याही प्रकारचे बेकायदेशिर कायमस्वरूपी झाडे अथवा उस पिकाचे लागण करू नये म्हणून तसेच दावा मिळकतीमधील वर नमुद रस्त्याचे क्षेत्राबाबत 'जैसे थे' परिस्थिती ठेवणेबाबतचा आदेश तातडीने होणेत यावा ही विनंती केली आहे.

**वादीतर्फे प्रतिवादी क्र.९ व ११ चे निशाणी क्र.३८ अर्जास म्हणणे खालीलप्रमाणे**–

०४. प्रतिवादी यांचा नि.३८ चा अर्ज व त्यामधील संपूर्ण मजकूर खोटा व लबाडीचा असून, तो वादी यांना मान्य नाही कबूल नाही. प्रतिवादी नं.९ व ११ यांना प्रस्तूत वादी विरूध्द कायद्याने तुर्तातुर्त ताकिद अर्ज देता येत नाही. त्यामुळे प्रतिवादीचा नि.३८ चा अर्ज प्रथम दर्शनी रद्द होणेस पात्र आहे. वास्तविक पाहता वादीने प्रस्तूतचा दावा हा हद्द कायम करून मिळणेबाबत व निरंतर ताकिदीबाबत दाखल केला आहे. अशा परिस्थितीमध्ये कायद्याने तुर्तातुर्त ताकिद अर्ज दाखल करता येत नाही. वादीचा दावा मिळकत गट नं.२०६९/१ हा मौजे वांगी हद्दीतील असून गट नं.५९५/१ हा मौजे भाळवणी हद्दीतील आहे. प्रतिवादीचा नि.३८ चा अर्ज पहिला असता त्यांना रस्ता असलेचे गृहीत धरून दाखल केलेचे दिसून येत आहे ही प्रतिवादीची लबाडी आहे. प्रतिवादी यांनी वस्तुस्थितीमध्ये जागेवरती वाद रस्ता अस्तित्वात असलेच प्रथम दाखवले पाहिजे. त्याशिवाय प्रतिवादी यांना वादीविरूध्द तुर्तातुर्त ताकिदीचा अर्ज दाखल करता येत नाही. दावा मिळकतीमध्ये वादी हे गेली ५० ते ६० वर्षांपासून ऊसासारखी बागायत पीके घेत आहेत. सदरचा ऊस वादी हे सोनहिरा सहकारी साखर कारखाना, कांती साखर कारखाना, हुतात्मा साखर कारखाना, विराज साखर कारखाना इत्यादी कारखान्यास गाळपास ऊस घालत होते व आलेले आहेत. त्यामुळे, वादी यांनी केव्हाही दावा मिळकत सोडून अतिक्रमण करून केव्हाही ऊसाची लागण केलेली नव्हती व नाही. त्यामुळे, प्रतिवादीचे निशाणी क्र.३८ चे अर्ज कलम २ मधील वाद रस्त्याच्या क्षेत्रामध्ये ऊसपीक व मोठी झाडे लावून वादी हे बदल करणार असलेबाबतचा मजकूर धांदात खोटा व लाबाडीचा असून तो या वादीना मान्य नाही कबूल नाही.

०५. प्रतिवादी यांचा निशाणी क्र.३८ चा अर्ज मोघम स्वरूपाचा असून त्यामध्ये प्रतिवादी नं.९ व ११ यांचे कोणते व कशा स्वरूपाचे नुकसान होणार आहे. याबाबतचे

स्पष्टीकरण निशाणी क्र.३८ चे अर्जामध्ये दिसून येत नाही. यावरूनच प्रतिवादी नं.९ व ११ चे काही एक नुकसान होत नाही हे स्पष्टपणे दिसून येत आहे. मे. कोर्टानी देणेत आलेला स्थगिती आदेश प्रतिवादी नं.१ ते ८ यांचे म्हणणे ऐकून आदेश पारित केलेला होता व आहे. सदरचे आदेशाचा वादीने केव्हाही गैरफायदा घेतलेला नव्हता व नाही. असे असतानाही प्रतिवादी हे त्यांचे अर्ज कलम ३ मध्ये वादी हे सदर मे. कोर्टाचे आदेशाचा गैरफायदा घेत आहेत. याबाबतचा संपूर्ण मजकूर प्रतिवादी यांनी अर्जाचे उभारणी करता यावी म्हणून नमुद केला असलेने तो या वादींना मान्य नाही कबूल नाही. वास्तविक पाहता गट नं.२०६९/१ चे पश्चिम बाजूस आरफळाचा दक्षिण–उत्तर चालीचा कॅनॉल असून प्रतिवादी अर्ज कलम ३ मध्ये कथन करतात त्याप्रमाणे केव्हाही शिवेचा रस्ता नव्हता व नाही. गट नं.२०६८ व ५९७ मधून केव्हाही शिवेवरचा रस्ता अस्तित्वात नव्हता व नाही. प्रस्तूत प्रतिवादी यांनी मे कोर्टाची दिशाभूल करणेकरिता गट नं.२०६८ व ५९७ मधून रस्ता असलेचे चुकीचे कथन केले आहे. प्रतिवादीचे अर्ज कलम ३ मधील वांगी–भाळवणी शिवेचा रस्ता गट नं.२०६८ व ५९७ मधून पूर्व बाजूपर्यंत सोडलेला असलेचे कथन केले आहे. ही प्रतिवादीची लबाडी आहे. कारण प्रस्तूतचा रस्ता कोठुन कोठेपर्यंत व किती फुट रूंदीचा सोडलेला आहे. याबाबतचे अर्जात कोठेही कथन केलेले नाही. ही प्रतिवादीची लबाडी आहे. यावरून प्रस्तूत प्रतिवादी यांनी खरी वस्तूस्थिती लपवून ठेवून खोट्या मजकुराचा अर्ज देवून मे. कोर्टात दिशाभूल करणेचा प्रयत्न केला असलेने निशाणी क्र.३८ चा अर्ज खर्चासह रद्द होणेस पात्र आहे. प्रतिवादी यास Prima facie केस नसून, Greater hardship व Balance of convenience वादीच्या बाजूने आहे.

०६. वादी यांनी त्यांचे गट नं.२०६९/१ मध्ये अडसाल ऊसाचे खोडवा पीक सोनहिरा साखर कारखाना या कारखान्यास गाळपास पाठवून त्यानंतर त्या शेतातमध्ये मेहनत–मशागत करून गव्हाचे व हरभराचे पीक घेतले होते. सदरचे पीक मार्च २०२६ मधील शेवटच्या आठवड्यात काढले आहे. त्यानंतर वादी यांनी मेहनत–मशागत करून सध्या त्यामध्ये वादींनी शेणखत टाकलेले आहे. तसेच गट नं.५९५/१ ही मिळकत वादी नं.२ व ३ यांची असून त्यापैकी वादी नं.३ यांचे आरफळ कॅनॉलचे पूर्वेस ऊसाचे पीक

असून त्यास ८ ते १० कांडया आहेत. सदर ऊसाचे पूर्वेस वादी नं.२ यांचे कारखान्यास गेलेले ऊसाचे पीक असून ते त्यामध्ये सध्या मेहनत केलेली आहे. तर सदर क्षेत्राच्या पूर्वेस म्हणजे गट नं.५९५/१ मध्ये हणमंत चव्हाण यांचे आल्याचे पीक आहे. अशी वस्तूस्थिती असताना ही वस्तूस्थिती मे. कोर्टापासून लपवून ठेवून प्रतिवादीने खोट्या मजकूराचा अर्ज दाखल केलेला असलेने तो खर्चासह रद्द होणेस पात्र आहे. प्रतिवादीचा प्रस्तुत अर्ज मंजूर केलेस वादी यांना त्यांचे शेतामध्ये मेहनत–मशागत करणे व उत्पन्न घेणे अवघड होणार आहे. त्यामुळे वादीचे कधीही पैशात न भरून येणारे नुकसान होणार आहे. याउलट प्रतिवादीना पर्यायी रस्ता उपलब्ध असलेने प्रस्तुतचा अर्ज नामंजूर केलेस प्रतिवादीचे काहीएक नुकसान होणार नाही. सबब, प्रतिवादींचा निशाणी क्र.३८ चा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती वादी यांनी केली.

०७. वादी व प्रतिवादी यांच्या परस्परविरोधी कथनांचा विचार केला असता खालील मुद्दे विचाराकरिता उपस्थित होतात, त्यावर मी माझे निष्कर्ष याखाली नमूद कारणांसह देत आहे;

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | प्रतिवादी हे त्यांना प्रथमदर्शनी केस असलेचे सिध्द करतात काय ? | : | नकारार्थी |
| २. | सोयीचा समतोल प्रतिवादी यांचे बाजूने आहे काय ? | : | नकारार्थी |
| ३. | मनाईचा आदेश न दिल्यास प्रतिवादी हे त्यांचे अपरिमित नुकसान होईल हे सिध्द करतात काय ? | : | नकारार्थी |
| ४. | काय आदेश ? | : | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र.१ ते ३ बाबत–**

०८. प्रस्तुतकामी वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री पी.एस. पाटील यांचा व प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञ सौ. एस.एच. जाधव यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावर

दाखल निशाणी क्र.३, ४६, ४८, ५० लगत दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीतर्फे विद्वान विधीज्ञ यांनी प्रस्तुतकामी असा युक्तीवाद केला की, सदरचा दावा वादीने हद्द कायम करुन मिळणेबाबत व निरंतर ताकीद मिळणेसाठी दाखल केला आहे. वाद मिळकत क्र.१अ म्हणजेच गट क्र.२०६९/१ ही संपूर्ण मिळकत वादी क्र.१ याची असून वाद मिळकत क्र.१ब गट क्र.५९५/१ यामध्ये प्रतिवादी क्र.२ ते ४ यांचा २हे.६९.७७ आर इतका हिस्सा आहे. प्रस्तुतकामी वादी यांनी प्रतिवादी क्र.१ ते ९ यांचेविरुध्द तूर्तातूर्त ताकीद अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.९ हा गट क्र.२०६८ मधील हिस्सेदार असून सदरचे गटामध्ये साधारणत: १० ते १२ इतर सहहिस्सेदार आहेत.

०९. वादीतर्फे विद्वान विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, गट क्र.२०६८ मध्ये प्रतिवादी क्र.९ व्यतिरिक्त इतर सहहिस्सेदार देखील आहेत. परंतु, त्यांनी कोठेही रस्ता मिळणेकरिता अर्ज दाखल केलेला नाही. केवळ प्रतिवादी क्र.९ याने दि.२९.०७.२०२५ रोजी तहसिलदार कार्यालय कडेगाव यांचेकडे वाद मिळकत १अ व १ब मधील शिवेवरुन रस्ता खुला करुन मिळणेबाबत अर्ज दिलेवरुन मंडल अधिकारी यांनी दि.१६.०९.२०२५ रोजी मौजे वांगी व भाळवणी येथील शिवेच्या हद्दीतील पाणंद रस्त्याच्या हद्दीच्या खूणा दाखविणेत व रस्ता खुला करणेकरिता प्रस्तुत वादी यांना दि.१६.०९.२०२५ रोजी नोटीस दिली. वादीतर्फे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, वादी यांना पर्यायी रस्ता उपलब्ध असताना त्यांना नव्याने रस्ता देण्याचे कोणतेही कारण नव्हते. दि.०२.०९.२०२५ रोजी वांगी व भाळवणी शिव हद्दीवरील गट क्र.५९५/१ व ५९७ व गट क्र.२६९ व २६८ यांची मोजणी करण्यात आली होती. परंतु, हद्दी दाखविल्या नव्हत्या हे स्पष्ट करणेकरिता त्यांनी फेरिस्त निशाणी क्र.३/११ लगत दाखल दि.१३.०९.२०२५ रोजीची नोटीस माझे निदर्शनास आणली.

१०. वादीतर्फे विद्वान विधीज्ञ यांनी गट क्र.२०६८ मध्ये प्रतिवादी क्र.९ व्यतिरिक्त इतर सहहिस्सेदार आहेत हे दर्शविणेकरिता फेरिस्त नि.क्र.४८/२ लगतचा गट क्र.२०६८ चा ७/१२ कडे माझे लक्ष वेधले. सदरचे ७/१२ उतारेचे अवलोकन केले असता त्यामध्ये प्रतिवादी क्र.९ आण्णासो पांडूरंग जाधव याचे व्यतिरिक्त इतर १३ ते

१४ सहहिस्सेदारांची नांवे असलेचे दिसून येत आहे. परंतु, केवळ प्रतिवादी क्र.९ यानेच रस्ता मिळणेकरिता अर्ज सादर केलेला होता असे निदर्शनास येते. वादीतर्फे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, वास्तविक पाहता गट क्र.२०६८ मधील सहहिस्सेदारांना व प्रतिवादी क्र.९ यास पर्यायी रस्ता उपलब्ध आहे व त्या रस्त्याबाबत वादी यांनी अर्ज कलम ७ मध्ये कथन केलेले आहे. वादी यांनी अर्ज कलम ९ मध्ये प्रस्तुत अर्ज दाखल करणेस कारण नमूद केलेले आहे. म्हणजेच प्रतिवादी यांनी वांगी भाळवणी शिवेवरील नसलेला रस्ता दांडगाव्याने केलेस वादीचे दावा मिळकतीतील ऊस व आले पिकाचे कशानेही भरुन न येणारे नुकसान होणार आहे, असे कथन केलेले आहे व त्याकरिता वादीने मोठ्या प्रमाणात खर्च केलेला आहे. त्यामुळे, प्रतिवादी क्र.९ यांनी प्रतिवादी क्र.१ ते ८ यांचे मदतीने गैरहक्काने रस्ता करु नये व पिकाचे नुकसान करु नये म्हणून वादीने दाव्याचा निकाल होईपर्यंत प्रतिवादीविरुध्द तूर्तातूर्त मनाईचा अर्ज दिलेला आहे.

११. वादीतर्फे विद्वान विधीज्ञ यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, वादी याची दावा मिळकत मालकी प्रतिवादी यांनी कोठेही नाकारलेली नाही. तसेच संभाव्य रस्ता झालेस वादी यास कठीण परिस्थितीत सामोरे जावे लागणार आहे व त्याची अपरिमित हानी होणार आहे. याउलट प्रतिवादी यांनी त्यांचे कैफियतीमध्ये कथन केलेप्रमाणे अशा प्रकारचा पाणंद रस्ता अस्तित्वात होता व त्या रस्त्याने वहिवाट करणेस वादीने मज्जाव केलेला आहे, हे दर्शविणे आवश्यक आहे. वादीतर्फे विधीज्ञ यांनी प्रतिवादी यांना पर्यायी रस्ता होता व आहे हे दर्शविणेकरिता फेरिस्त निशाणी क्र.३ लगत दाखल तहसिलदार यांचे रस्ता केस/एस.आर.०७/०२ व दावा क्र.११/०२ मधील दि.२९.०१.२००३ रोजीचे आदेशाकडे माझे लक्ष वेधले. सदरचे दाव्याचे कामी प्रतिवादी क्र.९ हे जाबदार क्र.२ होते. त्यामधील आदेशाकडे त्यांनी माझे लक्ष वेधले. त्या आदेशामध्ये मौजे वांगी येथील गट क्र.२०६६ च्या लगत अनुक्रमे २०५८, २०५९, २०६०, २०६७ व २०६६ च्या सरबांधावरुन प्रत्येकी चार फुट जागा सोडून आठ फुट रुंदीचा गाडी रस्ता मंजूर करणेत आलेला आहे.

१२. यापुढे वादीतर्फे विद्वान विधीज्ञ यांनी माझे लक्ष फेरिस्त निशाणी क्र.३/४ लगत दाखल असलेले रे.दि.मु.६८५/२००८ मधील तडजोडीकडे वेधले. सदरचे

दाव्याचे कामी प्रस्तुत कामातील प्रतिवादी क्र.९ आण्णा पांडूरंग जाधव हे त्याकामी प्रतिवादी क्र.२ होते. त्या तडजोडीचे कलम ४ चे अवलोकन केले असता त्यामध्ये स्पष्टपणे असे नमूद केलेले आहे की, दावा क्र.११/०२ या निकालाप्रमाणे आजमितीस वादी व प्रतिवादींची वहिवाट आहे. वादीतर्फे विधीज्ञ यांनी याठिकाणी असा युक्तीवाद केला की, यावरुनच असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.९ यांना तहसिलदार यांचे दि.२९.०१.२००३ रोजीचे आदेशाप्रमाणे मिळालेला रस्ता हा अस्तित्वात होता व त्याचा ते वापर करीत होते. त्यानंतर प्रतिवादी क्र.९ व इतर अर्जदार यांनी तहसिलदार यांचे कोर्टात रस्ता केस/एस.आर./८/१७ दि.२२.०६.२०१८ रोजी मामलतदार कोर्ट ॲक्ट कलम ५ प्रमाणे दाखल केलेली होती. वास्तविक पाहता प्रतिवादी क्र.९ यांनी सन २०१८ साली रस्ता मिळणेकरिता केस दाखल केली. परंतु, सन २००८ ते २०१८ या कालावधीत ते कोणत्या रस्त्याचा वापर करीत होते, हे स्पष्ट करणे आवश्यक ठरते. कारण त्यादरम्यान त्यांनी कोणतीही रस्त्याची मागणी केलेली नाही असा वादीतर्फे विधीज्ञ यांनी युक्तीवाद केला. महत्वाची बाब म्हणजे सदरची रस्ता मागणी ही तहसिलदार यांनी अमान्य केलेली होती.

१३. वादीतर्फे विद्वान विधीज्ञ यांनी याठिकाणी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र.९ याचे म्हणणेप्रमाणे जर वाद मिळकतीतून पाणंद रस्ता होता तर सन २००२ पासून ते प्रस्तुत दावा दाखल होईपर्यंत प्रतिवादी क्र.९ यांनी त्या रस्त्याची मागणी का केलेली नव्हती, हेदेखील प्रतिवादी स्पष्ट करु शकले नाहीत आणि जर असा पाणंद रस्ता होता तर प्रतिवादी क्र.९ यांनी इतर वेगवेगळे रस्ते मिळणेकरिता का कारवाया दाखल केल्या होत्या हेदेखील प्रतिवादी यांनी कैफियतीत कोठेही स्पष्ट केलेले नाही. महत्वाची बाब म्हणजे वादीतर्फे विद्वान विधीज्ञ यांनी माझे लक्ष फेरिस्त निशाणी क्र.५०/४ लगत दाखल रस्ता केस/एस.आर./१४/२०१७ या तहसिलदार यांचे निकालातील जाबदार यांचे म्हणणेकडे वेधले. सदरचे कामी प्रतिवादी क्र.९ आण्णा पांडूरंग जाधव हे जाबदार क्र.१६ म्हणून होते. त्यांनी त्यांचे म्हणणेमधील पुढील मजकूर माझे निदर्शनास आणला;

*"तसेच रस्त्यासाठी अन्य पर्याय म्हणून भाळवणी-शिरगाव रस्त्यालगत*

*असणाऱ्या गट क्र.२०७७, २०७८ व त्याचे दक्षिणेकडील गट क्र.२०७५ व २०७६ याचे सरबांधावरुन गट क्र.२०६८ पर्यंत रस्ता मंजूर करणेस हरकत नाही."*

वादीतर्फे विद्वान विधीज्ञ यांनी उपरोक्त मजकूर माझे निदर्शनास आणून असा युक्तीवाद केला की, त्या कामातील जाबदार व प्रस्तुत कामातील प्रतिवादी क्र.९ यांनी वर नमूद केलेला पर्यायी रस्ता सुचविलेला होता. याचाच अर्थ त्यांना पर्यायी रस्ते उपलब्ध होते असे दिसून येते. त्यामुळे, नव्याने रस्ता मागणेचे कोणतेही कारण नव्हते, हे स्पष्ट होते. याठिकाणी वादीतर्फे विधीज्ञ यांचे युक्तीवादाशी मी सहमत आहे.

१४. वादीतर्फे विद्वान विधीज्ञ यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र.९ व ११ यांनी निशाणी क्र.२९ लगत कैफियत दाखल केलेली आहे व त्यामध्ये वांगी–भाळवणी शिवेवर म्हणजेच वादी याच्या वाद मिळकतीमधून पाणंद रस्ता असलेचे कथन केलेले आहे. परंतु, असा रस्ता असलेबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा त्यांनी याकामी सादर केलेला नाही.

१५. वादीतर्फे विद्वान विधीज्ञ यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र.९ यांनी असेदेखील दर्शविलेले नाही की, सन २००३ साली तहसिलदार यांचेकडून त्यांना दावा क्र.११/०२ चे कामी मिळालेला रस्ता हा बंद झालेला आहे. अथवा सदरचा रस्ता वापरात आणणेकरिता त्यांनी दरखास्त दाखल केली होती किंवा नाही हेदेखील स्पष्ट केलेले नाही. प्रतिवादी हे कैफियतीमध्ये वांगी–भाळवणी शिवेवरील रस्ता शाबीत झालेला होता असे कथन घेऊन आलेले आहेत, हे त्यांनी कशाचे आधारे केलेले आहे, हे स्पष्ट केलेले नाही. महत्वाची बाब म्हणजे प्रतिवादी क्र.९ यांचे कैफियतीमध्ये असे कोणतेही कथन नाही की सन २००२ पासून त्याला मेहनत मशागत करणे अशक्य झालेले आहे अथवा त्याची जमीन त्यामुळे पडीक झालेली आहे, हे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा प्रतिवादी क्र.९ ने अभिलेखावर आणलेला नाही. याचाच अर्थ प्रतिवादी क्र.९ हा सन २००२ पासून आजमितीपर्यंत त्याचे शेतजमिनीत पीक घेत आलेला आहे, असे स्पष्ट होते. याठिकाणी वादीतर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद हा संयुक्तिक असलेचे दिसून येत आहे.

१६. यानंतर वादीतर्फे विधीज्ञ यांनी माझे लक्ष फेरिस्त निशाणी क्र.४८/१ लगत तहसिलदार यांचेकडील आर.टी.एस. अपील क्र.३/२०१८ याकडे वेधले. त्याकामी प्रतिवादी क्र.९ अपीलदार होते. त्या कामातील आदेशाकडे त्यांनी माझे लक्ष वेधले व असा युक्तीवाद केला की, तहसिलदार यांनी त्याकामी भाळवणी शिरगाव रस्त्यालगत असणारा गट क्र.२०७६, २०७५, २०७२, २०७१ व २०७० चे सरबांधावरुन पुढे उत्तरेकडे गट क्र.२०७१, २०६८, २०५८, २०५५, २०५७ चे सरबांधावरुन गट क्र.२०५६ चे हद्दीपर्यंत बैलगाडी रस्ता मंजूर केलेला आहे. त्यांनी असा युक्तीवाद केला की, जर प्रतिवादी क्र.९ यांना सन २०१८ साली आणखी एक रस्ता तहसिलदार यांनी मंजूर केलेला असेल तर अशा परिस्थितीत वादी यांचे मिळकतीमधून रस्ता मागणेचे प्रतिवादी क्र.९ यांना कोणतेही कारण नव्हते व नाही. याठिकाणी मला वादीतर्फे विधीज्ञ यांचे युक्तीवादास अनुसरुन फेरिस्त निशाणी क्र.३/१८ लगत दाखल केलेला नकाशा याचे अवलोकन केले असता त्यांचे युक्तीवादामध्ये तथ्य असलेचे दिसून येते. वास्तविक पाहता प्रतिवादी क्र.९ यास यापूर्वी रस्ते मिळाले असताना पुन्हा रस्ता मिळणेकरिता केलेला अर्ज हा सद्हेतूने केला असलेचे दिसून येत नाही. तसेच युक्तीवादादरम्यान प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञ यांनी पूर्वी मिळालेले रस्ते हे बंद झालेले आहेत अथवा विशेषकरुन सन २०१८ साली तहसिलदार यांनी दिलेले रस्त्यास स्थगिती दिलेली आहे, हेदेखील माझे निदर्शनास आणलेले नाही.

१७. वादीतर्फे विधीज्ञ यांनी एकदा पर्यायी रस्ता उपलब्ध असताना इतर रस्त्याची मागणी करता येत नाही, हे दर्शविणेकरिता माझे निदर्शनास फेरिस्त निशाणी क्र.५०/३ लगत दाखल असलेले शासन परिपत्रक दि.२०.०४.२०२६ कडे माझे लक्ष वेधले. त्यामधील मजकूराचे अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम १४३ अंतर्गत रस्त्याचा हक्क देण्याचा मुख्य उद्देश म्हणजे संबंधित जमिनीला योग्य व वाजवी प्रवेश (Reasonable Access) उपलब्ध करुन देणे हा आहे. तथापि, असे निदर्शनास आले आहे की, एखाद्या शेतकऱ्याला त्याचे शेतामध्ये जाणेकरिता रस्ता अस्तित्वात असतानाही नव्याने दुसरा रस्ता मागणेचे प्रकार

होत आहेत. या अनुषंगाने जर शेतकऱ्याला त्याचे शेतजमिनीमध्ये जाणेसाठी रस्ता असेल अशा परिस्थितीत नवीन किंवा पर्यायी रस्ता कोणत्याही परिस्थितीत मंजूर करणेत येऊ नये. एखाद्या शेतकऱ्याला केवळ अधिक सोयीसाठी कमी अंतरासाठी किंवा वैयक्तिक फायद्यासाठी रस्ता मंजूर करु नये. या परिपत्रकाशिवाय वादीतर्फे विधीज्ञ यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील *Parsappa Murgyappa Kalmadi & Ors. Vs. Birappa Pandurang Daingade & Ors. W.P. No.11301 of 2025 dated 14.10.2025* या न्यायनिवाड्यातील परिच्छेद क्र.५ व ११ चा आधार घेतलेला आहे. ते परिच्छेद याखाली अवलोकनार्थ नमूद करीत आहे.

> ***5.*** *The Trial Court after considering rival contentions observed that sale deed of respondent no.1 is dated 29.11.2004, whereas sale deed of petitioners is dated 13.09.2024. As per sale deed of petitioners, on Western side there is North-South cart way. As such, prima facie observations of Tahsildar in his order passed under Section 143 of MLR Code is contrary to record. The Trial Court further observed that Tahsildar erroneously assumed that Umrani to Khojanwadi road is private road of owners of Gut Nos.1280 and 1281. The Trial Court has further observed that, when petitioners have alternate road, jurisdiction under Section 143 of MLR Code could not have been exercised. Accordingly, allowed application Exhibit-5 and granted injunction against petitioners from creating new way from Eastern side/shiv of respondent's suit property from Gut No.384 as per order passed by Tahsildar.*
>
> ***11.*** *On prima facie consideration of aforesaid material, Trial Court was well as Appellate Court recorded findings that plaintiff has made out prima facie case as regards to erroneous exercise of jurisdiction by Tahsildar under Section 143 of MLR Code and granted temporary injunction in favour of respondent no.1. This Court finds that view taken by Courts below is based on appreciation of material on record. No perversity is discernible in impugned orders. No case is made out to exercise jurisdiction under Article 227 of Constitution of India.*

उपरोक्त न्यायनिवाड्याचे अवलोकन केले, तसेच शासन परिपत्रक

क्र.वि.प.आ.–२०२६/प्र.क्र.६८ (E १६२४३९६)/पाणंद रस्ते याचे अवलोकन केले असता वादीतर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद हा संयुक्तिक असलेचे दिसून येत आहे.

१८. तर प्रतिवादी क्र.१ ते ८ तर्फे म्हणजेच सरकार पक्षातर्फे विद्वान विधीज्ञ श्री.एम.एच. ग्रामोपाध्ये यांनी अभिलेखावर दाखल दि.०४.११.१९८७ रोजीचा शासन निर्णय माझे निदर्शनास आणून असा युक्तीवाद केला की, एखाद्या शेतकऱ्याला त्याची जमीन मशागत करणे शक्य होणेकरिता पाणंद रस्ते व बांधावरील रस्ते देणेबाबत शासनाने सन १९८७ सालापासून वेळोवेळी शासन निर्णय जाहीर केलेले आहेत. त्यानंतर त्यांनी प्रतिवादी क्र.१ ते ८ तर्फे दाखल इतर शासन निर्णयांकडे म्हणजेच दि.२९.०८.२०२५ रोजीचा शासन निर्णय व त्यानंतर दि.०१.०९.२०२५ रोजीचा शासन निर्णय याकडे माझे लक्ष वेधले व पाणंद रस्ते याबाबत शासनाने केलेल्या तरतुदी याबाबत युक्तीवाद केला. परंतु, माझे मतानुसार सदरचे शासन निर्णयांचा प्रस्तुत प्रकरणाशी थेट संबंध प्रस्थापित होत नाही. त्या शासन निर्णयामध्ये कोठेही पाणंद रस्ते कसे उपलब्ध करुन द्यावेत? तसेच पाणंद रस्त्याचे मोजमापाचे मापदंड काय? तसेच सदरचे रस्ते केव्हा व कोणत्या परिस्थितीत देता येतील, याबाबत कोणतीही मार्गदर्शक तत्वे असलेची दिसून येत नाही. त्यामुळे, केवळ प्रतिवादी क्र.९ याने मागणी केलेनंतर प्रतिवादी क्र.१ ते ८ म्हणजेच शासन तर्फे त्यांना कशाचे आधारे पाणंद रस्ता देणेचा निर्णय घेणेत आला हे स्पष्ट होत नाही.

१९. तर प्रस्तुतकामी प्रतिवादी क्र.९ तर्फे विद्वान विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, त्यांनी फेरिस्त दि.२.०२.२०२६ रोजीचे फेरिस्तने अ.क्र.८ लगत गहाणखत दस्त क्र.१४६२/२०१८ हा दाखल केलेला आहे. सदरचा दस्त हा वादी क्र.१ यांनी दि.१२.१०.२०१८ रोजी बँकेला करुन दिलेला असून त्यामधील पान क्र.८ वर नमूद वाद मिळकत गट क्र.२०६९ याची दक्षिणेकडील चतु:सिमा ही भाळवणी–वांगी शिव अशी नमूद केलेली आहे. तर वादीने सदरची वस्तुस्थिती लपवून दाव्यामध्ये गट क्र.२०६९/१ याची दक्षिणेकडील चतु:सिमा गट क्र.५९५/१ या गटाची मिळकत अशी नमूद केलेली आहे. वादीने चुकीची चतु:सिमा देऊन कोर्टाची दिशाभूल केलेली आहे, त्यामुळे ते मनाई हुकूम मिळणेस पात्र नाहीत, असा त्यांनी युक्तीवाद केला. परंतु,

याठिकाणी वादीतर्फे विधीज्ञ यांनी असे स्पष्ट करुन दिले की, गट क्र.२०६९/१ चे दक्षिण बाजूला भाळवणी–वांगी शिव व त्यापलीकडे गट क्र.५९५/१ हा असलेने वादी यांनी योग्य ती चतु:सिमा दिलेली आहे. केवळ शिवेचा उल्लेख केलेला नाही म्हणून चतु:सिमा चुकीची ठरत नाही. याठिकाणी प्रतिवादीतर्फे विधीज्ञ यांचे युक्तीवादामध्ये मला तथ्य असलेचे दिसून येत नाही.

२०. यानंतर प्रतिवादी क्र.९ तर्फे विद्वान विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, जर पूर्वी मोजणी केलेली नसेल तर अशा प्रकारे वाद मिळकतीच्या हद्दी निश्चित करणेकरिता दावा दाखल करता येत नाही. परंतु, त्यांनी या युक्तीवादाचे पुष्ट्यर्थ असा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. पुढे प्रतिवादीतर्फे विधीज्ञ यांनी पाणंद रस्ते हे शासनाने मंजूर केलेले आहेत हे दर्शविणेकरिता शासन निर्णय क्र.लवेसू–२०२५/प्र.क्र.४५८/भूमापन दि.०१ ऑगस्ट, २०२५ चा असून त्याकडे माझे लक्ष वेधले व शासनाने पाणंद रस्ते मंजूर करणेबाबत निर्णय घेतला आहे असा युक्तीवाद केला. परंतु, त्या शासन निर्णयाचे अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, राज्यातील सर्व शेत/पाणंद रस्ते शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची ने–आण करता येईल यादृष्टीने मजबूत करणे, याकरिता उपाययोजना सुचविणे व त्याचा कालबध्द आराखडा तयार करणेसाठी समिती गठीत करणेत आलेली आहे. याव्यतिरिक्त त्यामध्ये पाणंद रस्ते करणेबाबतचा आराखडा अथवा मार्गदर्शक तत्वे नमूद केलेची दिसून येत नाहीत. त्यामुळे, त्या शासन निर्णयाचा प्रतिवादी यांना कोणताही लाभ घेता येत नाही, या मताचा मी आहे.

२१. प्रतिवादी क्र.९ तर्फे विद्वान विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र.९ हा सुमारे वीस वर्षापेक्षा अधिक कालावधीपासून शेतजमिनीत मेहनत मशागत करणेकरिता रस्त्यासाठी प्रयत्न करीत आहे, यावरुनच त्यास रस्ता उपलब्ध नाही असे दिसून येते. त्यामुळे, वादी याचा मनाई अर्ज नामंजूर करणेत यावा. त्यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, रस्त्याअभावी प्रतिवादी तसेच इतर सहहिस्सेदार यांनी त्यांचे गट क्र.२०६८, ५९७ मधून जाणारा वांगी व भाळवणी शिवेचा रस्ता पूर्व बाजूकडून सोडलेला आहे. मात्र पश्चिम बाजूकडून सदरचा रस्ता होऊ नये या दुष्ट हेतूने वादीने

सदरचा दावा दाखल केला आहे व त्या दाव्याचे कामी प्रतिवादी क्र.१ ते ८ यांचेविरुध्द निशाणी क्र.१३ येथे घेतलेले आदेशाचा गैरफायदा घेऊन सदर शिवेचे रस्त्यावर कोणत्याची प्रकारचे बेकायदेशीर कायमस्वरुपी झाडे अथवा ऊस पिकाची लागण करु नये म्हणून त्या रस्त्याचे क्षेत्राबाबत जैसे थे परिस्थिती ठेवणेबाबत तातडीने आदेश व्हावा अशी विनंती केलेली आहे व त्यासंदर्भात निशाणी क्र.३८ वर तूर्तातूर्त ताकीद अर्ज वादीविरुध्द दाखल केलेला आहे. सदरच्या अर्जास वादी यांनी म्हणणे दाखल केलेले आहे. परंतु, मुलतः प्रतिवादी यांनी केलेली मागणी ही वस्तुस्थितीनिष्ठ असलेचे दिसून येत नाही. कारण वादी अथवा इतर कोणीही इसम शिवेच्या बांधावर पिकाची लागण करणेची कोणतीही शक्यता असलेचे दिसून येत नाही. तसेच वादीने अभिलेखावर दाखल केलेल्या छायाचित्रावरुन शिवेचे बांधावर पूर्वीच मोठी झाडे आहेत, असे दिसून येत आहे. त्यामुळे, प्रतिवादी यांनी केलेली मागणी ही सनदशीर असलेचे दिसून येत नाही व या कारणाने प्रतिवादी क्र.९ हे त्यांना प्रथमदर्शनी बाजू नसलेने व मनाई हुकूम न मिळालेस त्यांची हानी होईल हे दर्शवू न शकलेने त्यांनी मागणी केलेप्रमाणे निशाणी क्र.३८ लगतचा अर्ज मंजूर होऊन मिळणेस पात्र ठरत नाही. उपरोक्त विवेचनास अनुसरुन मुद्दा क्र.१ ते ३ बाबत नकारार्थी निष्कर्ष देऊन मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे;

## आदेश

१. प्रतिवादी यांचा निशाणी क्र.३८ चा अर्ज नामंजूर करणेत येत आहे.

२. खर्चाचा विचार अंतिम निर्णयावेळी करणेत येईल.

AVINASH RAMAKANT MALVADE

Digitally signed by AVINASH RAMAKANT MALVADE
Date: 2026.05.21 17:13:08 +0530

विटा. (अविनाश र. माळवदे)

दि.२१.०५.२०२६ दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, विटा,

ता.खानापूर, जि.सांगली.

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the dictation.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | S.V. Gaikwad, (Grade-II) |
| Name of the Court | : | Civil Judge Senior Division, Vita. |
| Date of pronouncement | : | 21.05.2026 |
| Judgment/order signed by the Presiding Officer on | : | 21.05.2026 |
| Judgment/order uploaded on | : | 21.05.2026 |